# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.

ई-मेलः **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट- www.mercindia.org.in

## प्रसिध्दी पत्रक

## बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत, रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या वितरण व्यवसायाची आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० साठी वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वीज दराची निश्चिती

बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत, रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या वितरण व्यवसायाचा पहिला नियंत्रण कालावधी हा १ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च २०१० या तीन आर्थिक वर्षांचा ठरविण्यात आला आहे. या नियंत्रण कालावधीतील २४ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीकरिता रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या वितरण व्यवसायाची वार्षिक महसूली गरज (एआरआर) आणि विजेचे दर आयोगाने निश्चित केले आहेत.

रिलायन्स एनर्जी लिमिटेडने त्यांच्या वितरण व्यवसायाकरिता बहु-वर्षीय वीज दराची याचिका ३१ जानेवारी, २००७ रोजी सादर केली. या याचिकेत आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वार्षिक महसूली गरज रु. ३८००

कोटी तसेच महसूली तूट रु. ६२८ कोटी दाखविण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २००८-०९ आणि आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक महसूली गरज अनुक्रमे रु. ३३५२ कोटी आणि रु. ३५३४ कोटी तसेच संचित महसूली तूट अनुक्रमे रु. ८२१ कोटी आणि रु. १०१० कोटी दाखविण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २००७-०८ च्या वीज दराच्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः-

१. बीपीएल वर्गवारीतील ग्राहकांच्या वीज दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. – प्रति महिना ३०० युनिटस्पर्यंत वीज वापर करणा-या निवासी ग्राहकांच्या मूळ वीज दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

२. **भरमसाठ वीज वापरास आळा बसावा यासाठी जादा आकार**
स्वतः उत्पादित केलेली वीज आणि राज्याबाहेरुन खरेदी केलेली महागडी वीज वापरुन मुंबई शहरातील परवानाधारकांनी विजेची मागणी कशीबशी पुरी करुन शहरातील विजेच्या मागणी व पुरवठ्यात योग्य समतोल साधला आहे. आयोगाने जादा वीज वापरणा-या वर्गवारीतील ग्राहकांना जादा आकार लागू केले आहेत.

**अ.** पूर्वी जाहिरात आणि जाहिरातींचे फलक म्हणून ओळखली जाणारी वर्गवारी ज्यामध्ये प्रकाश

झोत, विविध ठिकाणी लावलेले निऑन साईन्स आणि वाणिज्यिक आस्थापनांवरील जाहिरात फलक यांचा समावेश होतो, अशा एलटी-८ वर्गवारीकरिता, वीज दरात- पूर्वी जो स्थिर आकार दर महा रु. २०० आणि उर्जा आकार रु. ११.०० प्रति युनिट होता तो आता- स्थिर आकार दर महा रु. ४००, उर्जा आकार प्रति युनिट रु. १३.५५ वाढविण्यात आला आहे आणि प्रति युनिट रु. १.०९ इतका रिलायेबिलिटी आकार लागू करण्यात आला आहे. वीज दर अशा रितीने निश्चित करण्यात आले आहेत की, ग्राहकांना वितरण परवानाधारकाकडून वीज घेण्याऐवजी डिझेल सेट्स इ.वर चालणा-या स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती केंद्राकडून वीज पुरवठा घेणे आर्थिकदृष्ट्या अधिक किफायतशीर ठरेल.

**ब. मल्टिप्लेक्स आणि मॉल्स**

सर्व मल्टिप्लेक्सेस आणि शॉपिंग मॉल्स ज्यांचा मंजूर भार २० किलोवॅटहून अधिक आहे त्यांच्यासाठी एक वेगळी वर्गवारी आयोगाने सुरु केली आहे. त्यामध्ये स्थिर आकार प्रति केव्हीए प्रति महिना रु. ३००, उर्जा आकार प्रति युनिट रु. ७.४० आणि रिलायेबिलिटी आकार प्रति युनिट रु. १.०९ मिळून एकूण रु. ८.४९ प्रति युनिट इतका दर आकारण्यात येईल.

३. नियंत्रण कालावधीतील वाणिज्यिक तोटे दर वर्षी अर्धा टक्क्याने कमी करण्याचे निदेश आयोगाने रिलायन्स एनर्जी लिमिटेडला दिले आहेत. आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वितरण हानि ११.५० टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे लक्ष्य आयोगाने घालून दिले आहे.

४. **वीज मागणीचे व्यवस्थापन**

परवानाधारकाच्या क्षेत्रातील वीज पुरवठा विना-व्यत्यय चालू रहावा यासाठी अल्पमुदतीकरिता त्याचप्रमाणे टाटा पॉवर कंपनीच्या युनिट-४ कडून महागड्या विजेची खरेदी परवानाधारक करीत आहे. महागड्या विजेची खरेदी दोन टक्क्यांनी कमी करावी आणि वीज बचतीचे उपाय योजून तेवढीच वीज परवानाधारकाने भरून काढावी, असा निर्णय आयोगाने या आदेशाद्वारे दिला आहे. ही वीज एकूण विजेच्या गरजेच्या ०.१० टक्के इतकीच असून त्यामुळे

वीज खरेदीचा एकूण खर्च रु. ४.८१ कोटींनी कमी होणार आहे. रिलायन्स एनर्जी लिमिटेडचा वीज दर निश्चित करताना प्रथमच वीज मागणी व्यवस्थापनाची बाब त्यामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. यामुळे नियोजनबध्द वीज मागणी व्यवस्थापनाच्या उपाय-योजनांच्या माध्यमातून उर्जा संवर्धनाचे आणि उर्जा कार्यक्षमतेचे उपाय योजण्यास रिलायन्स एनर्जी लिमिटेडला प्रोत्साहन मिळेल.

५. जाहीर सुनावणीच्या वेळी करण्यात आलेल्या सूचना विचारात घेऊन आयोगाने एलटी-३ (पूर्वीची एलटीपी-१) वर्गवारीच्या मंजूर भाराची मर्यादा २० किलोवॅट पर्यंत वाढवली आहे, तर एलटी-४ (पूर्वीची एलटीपी-२) वर्गवारीकरिता आकारण्यात येणारा स्थिर आकार प्रति महिना प्रति केव्हीए रु. ३७४ वरून रु. ३०० इतका कमी केला आहे.

६. **रिलायन्स एनर्जी लि.च्या बाजूने विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेला आदेश व त्याचा परिणाम**

रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या आर्थिक वर्ष २००५-०६ ची वार्षिक महसूली गरज त्याचप्रमाणे आर्थिक वर्ष २००६-०७ ची वार्षिक महसूली गरज आणि वीज दर निश्चित करण्याच्या प्रकरणी आयोगाने दिनांक ३ ऑक्टोबर, २००६ रोजी आदेश पारित केला होता. या आदेशात, कर्मचा-यांवरील खर्च, प्रशासकीय आणि सर्वसाधारण खर्च आणि आर्थिक वर्ष २००४-०५ व आर्थिक वर्ष २००५-०६ मधील प्राप्ति-कराची

रक्कम खर्च म्हणून वसूल करण्यास परवानगी देण्यात आली नव्हती. या मुद्यांविरुध्द कंपनीने विद्युत अपील न्यायाधिकरणात अपील केले होते. विद्युत अपील न्यायाधिकरणाने त्यांच्या दिनांक ४ एप्रिल, २००७ च्या आदेशान्वये रिलायन्स एनर्जी लिमिटेडचे अपील क्र. २००६ चे २५१ ग्राह्य ठरविले असून रिलायन्स एनर्जी लिमिटेडला वरील लेखा-शीर्षांखाली एकूण रु. २६४ कोटी इतकी रक्कम आर्थिक वर्ष २००४-०५ आणि आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये खर्च म्हणून वसूल करण्यास परवानगी दिली आहे.

रिलायन्स एनर्जी लिमिटेडने दिनांक १४ एप्रिल, २००७ आणि दिनांक १८ एप्रिल, २००७ रोजी या संदर्भात प्रतिज्ञापत्रे सादर केली. त्यामध्ये विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या दिनांक ४ एप्रिल, २००७ च्या आदेशाची अंमलबजावणी केल्यामुळे , ग्राहकांना वीज दरवाढीचा धक्का बसू नये म्हणून, नियंत्रण कालावधीच्या तीन वर्षात सदर रकमांची वसूली करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

७. विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या आदेशामुळे होणारा परिणाम विचारात न घेता, आयोगाने, सुरुवातीला आर्थिक वर्ष २००७-०८ करिता रु. ३८४० कोटीची वार्षिक महसूली गरज आणि परिणामी रु. ६२८ कोटीची महसूली तूट ठरविली आहे. त्याशिवाय, विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या परवानगीनुसार देय असलेल्या १/३

रकमेचा, म्हणजेच रु. ८८ कोटी इतकी रक्कम देखील, आर्थिक वर्ष २००७-०८ च्या वीज दरातून वसूल करण्यासाठी विचारात घेणे आवश्यक ठरले आहे. तथापि, दरवाढीचा ग्राहकांवर होणारा परिणाम मर्यादित रहावा याकरिता, आर्थिक वर्ष २००७-०८ च्या सुधारित वीज दराद्वारे एकूण रु. ६१४ कोटी वसूल करण्यास परवानगी देण्याचे आणि उरलेली रक्कम रु. १०२ कोटी नियंत्रण कालावधीतील दुस-या व तिस-या वर्षांकरिता वर्ग करण्याचे आयोगाने ठरविले आहे.

८. **रिलायेबिलीटी आकार :** आयोगाने उर्जा आकारापासून रिलायेबिलीटी आकार वेगळा केला आहे. या रिलायेबिलीटी आकारात खालील दोन प्रमुख घटक आहेतः

अ. स्टॅण्ड बाय आकार.

ब. मंजूर केलेला महागड्या विजेच्या खरेदीचा खर्च

महावितरण कंपनीबरोबर केलेला स्टॅन्ड-बाय करार अस्तित्वात असल्यामुळे मुंबई उपनगरातील ग्राहकांना, राज्यातील इतर भागातील ग्राहकांच्या तुलनेत, गेली अनेक वर्षे विनाव्यत्यय वीज पुरवठा खात्रीने मिळत आहे. त्यामुळे परवानाधारकांच्या वीज पुरवठा क्षेत्रामध्ये आणिबाणीच्या परिस्थितीत भार नियमनाला तोंड द्यावे लागत नाही. या विनाव्यत्यय वीज पुरवठ्यावर सुमारे रु. २२० कोटींचा खर्च होत आहे.

आयोगाने मंजूर केलेल्या महागड्या वीज खरेदीचा सुमारे रु. २४० कोटीं इतका आहे. सदर खर्च विनिर्दिष्ट केलेल्या ठराविक ग्राहक वर्गवारींना लावण्यात येईल.

यापूर्वीच्या वीज दराच्या आदेशांमध्ये स्टॅन्ड-बाय आकार आणि महागड्या विजेच्या खरेदीचा खर्च हा सर्व ग्राहकांना लागू असलेल्या उर्जा आकारात समाविष्ट करण्यात येत होता.

रिलायेबिलीटी आकार खालीलप्रमाणे आकारण्याचे आयोगाने ठरविले आहेः

अ. बीपीएल वर्गवारी वगळून ग्राहकांच्या इतर सर्व वर्गवारीकरिंता प्रति युनिट २९ पैसे या समान दराने स्टॅण्ड-बाय आकार

ब. बीपीएल वर्गवारी, एलटी-१ (पूर्वीच्या एलएफ-१ निवासी वर्गवारीतील) ३०० युनिटस्पेक्षा कमी वीज वापर करणारे ग्राहक, आणि एलटी २- (पूर्वीच्या एलएफ २-वाणिज्यिक वर्गवारीतील) ३०० युनिटस्पेक्षा कमी वीज वापर करणारे ग्राहक वगळून, या वर्गवारींना वीज दरवाढीचा धक्का बसू नये म्हणून, उरलेल्या सर्व ग्राहकांना महागड्या विजेच्या खरेदीचा खर्च आकारण्यात येईल.

क.  बीपीएल ग्राहकांना कोणत्याही प्रकारचा रिलायेबिलिटी आकार लावण्यात येणार नाही.

९. सोबतच्या जोडपत्र-१ मध्ये, रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या एलटी व एचटी वर्गवारीतील ग्राहकांना लागू असलेल्या वीज दराचा सारांश देण्यात आला आहे.

१०. सोबतच्या जोडपत्र-२ मध्ये, वेगवेगळ्या वीज वापरावर आधारित सुधारित वीज दरानुसार ग्राहकाच्या मासिक देयकावर होणार परिणाम दर्शविण्यात आला आहे.

११. आयोगाचा दिनांक २४ एप्रिल २००७ चा वीज दराचा सविस्तर आदेश आयोगाच्या WWW.MERCINDIA.ORG.IN या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

मुंबई, (मालिनी शंकर)
२४ एप्रिल, २००७ सचिव, मविनिआ.

**Annexure I - Summary of LT and HT Tariff effective from 24th April 2007 in REL's License Area**

| | Fixed / Demand Charge (Rs /Consumer/month) | Energy Charge (Rs/Unit) | Reliability Charge | |
|---|---|---|---|---|
| | | | Stand By | Expensive Power |

| | | | charges | |
|---|---|---|---|---|
| **LT Category** | | | | |
| BPL | Rs. 3 per month | 0.40 | | |
| **LT - 1 (Residential)** | | | | |
| 0 - 100 units | Rs 30 per month | 1.40 | 0.29 | |
| 101 – 300 units | Rs 50 per month | 3.50 | 0.29 | |
| 300-500 | Rs 50 per month | 5.60 | 0.29 | 0.45 |
| >=500 | Rs.100 per month $ | 6.10 | 0.29 | 0.80 |
| **LT - 2 (Commercial)** | | | | |
| 0 - 300 units | Rs. 200 per month $$ | 4.75 | 0.29 | |
| 301 - 1000 units | | 6.50 | 0.29 | 0.45 |
| >= 1001 units | | 7.40 | 0.29 | 0.80 |
| **LT--3 (Upto 20 kW)** | Rs.200 per month | 4.80 | 0.29 | 0.45 |
| **LT - 4** (Including LT Industries above 20 kW load) | Rs. 300 per kVA per month | 3.90 | 0.29 | 0.80 |
| ***ToD Tariff (in addition to above base tariffs)*** | | | | |
| ***1800 hours to 2200 hours*** | | 0.60 | | |
| ***Remaining Hours of the day*** | | 0.00 | | |
| **LT-5 (Agriculture)** | Rs. 15 per HP per month | 0.80 | 0.29 | |
| **LT -6 (Street Light)** | Rs. 300 per kVA per month | 5.90 | 0.29 | 0.45 |
| **LT – 7 (Temporary Connection)** | | | | |
| Religious Purpose | Rs. 200 per month $$ | 1.40 | 0.29 | 0.80 |
| Others Purpose | | 10.50 | 0.29 | 0.80 |
| **LT – 8 (Advertisement & Hoarding)** | Rs. 200 per month | 13.55 | 0.29 | 0.80 |
| **LT – 9 (Multiplex & Shopping Malls)** | Rs. 300 per kVA per month | 7.40 | 0.29 | 0.80 |
| **HT Category** | | | | |
| HT-1 ( HT Group Housing Society) | Rs. 300 per kVA per month | 3.15 | 0.29 | 0.45 |
| HT – 2 ( Industrial) | Rs. 300 per kVA per month | 4.40 | 0.29 | 0.80 |
| ***ToD Tariff (in addition to above base tariffs)*** | | | | |
| ***1800 hours to 2200 hours*** | | 0.60 | | |
| ***Remaining Hours of the day*** | | | | |

Note:

1. Fuel Adjustment Charges (FAC) will be applicable to all consumers and will be charged over and above tariffs, on the basis of FAC formula prescribed by the Commission, and computed on a monthly basis.

2. $: Fixed Charge of Rs. 100 per month will be levied on residential consumers availing 3 phase supply. Consumers should be provided with 3-phase supply as per the conditions stated in the MERC Supply Code Regulation. Additional Fixed Charge of Rs. 100 per 10 kW load or part thereof above 10kW load shall be payable.

3. $$: In case of LT-2 (Commercial) consumers and LT-7 (Temporary Connections), additional Fixed Charge of Rs. 150 per 10 kW load or part thereof above 10kW load shall be payable

**Annexure II**

**Illustrative Impact on Monthly Bills due to revised Tariffs**

| Category | Monthly Consumption (units) | Billing Demand (kVA) | Bill at Existing Tariff | Bill at Revised Tariff Including Standby & Expensive Power | Increase/ Decrease |
|---|---|---|---|---|---|
| **LT Category** | | | | | |
| LT - 1 (Residential) | | | | | |
| BPL | 25 | | 13 | 13 | 0% |
| | | | | | |
| Residential Other Than BPL | | | | | |
| 0 - 100 units | 75 | | 150 | 157 | 4% |
| 101 - 300 units | 200 | | 570 | 598 | 5% |
| 300-500 units | 400 | | 1,505 | 1,611 | 7% |
| >=500 units | 1000 | | 4,955 | 5,890 | 19% |
| | | | | | |
| LT – 2 (Commercial) | | | | | |
| 0 - 300 units | 150 | | 838 | 956 | 14% |
| 301 - 1000 units | 600 | | 2,975 | 3,884 | 31% |
| >= 1001 units | 1500 | | 8,225 | 11,025 | 34% |
| LT- 3 (Industrial) (Upto 20 kW) | 4000 | | 19,150 | 22,360 | 17% |
| LT-4 (Industrial) (> 20kW) | 65000 | 24.32 | 2,36,597 | 3,31,647 | 40% |
| LT- 8 (Advertisement and Hoarding) | 1000 | | 11,200 | 15,040 | 34% |
| LT – 9 (Multiplexes & Shopping Malls) | 1,10,000 | 23.23 | 7,13,475 | 9,40,869 | 32% |
| **HT Category** | | | | | |
| HT -1 (Group Housing) | 40000 | 8.18 | 123,061 | 158,055 | 28% |
| HT -2 (Industrial) – (Bulk users: hotels, flight kitchens, Cinemas etc.) | 250000 | 58.53 | 821,888 | 1,3,90,058 | 69% |